Parinee Crescenzo, "A" Wing, 1102, 11th Floor,
"G" Block, Plot No. C38 & C39,
Behind MCA, Bandra Kurla Complex,
Bandra (E), Mumbai - 400 051, India.
Phone : 91-22-6124 0444 / 6124 0428
Fax : 91-22-6124 0438
E-mail : vinati@vinatiorganics.com
Website : www.vinatiorganics.com
CIN : L24116MH1989PLC052224

VINATI ORGANICS LIMITED

April 9, 2026

**BSE Limited.**
(Listing Department)
P. J. Towers, 1st Floor,
Dalal Street, Mumbai – 400 001.

**Scrip Code: 524200**

**National Stock Exchange of India Ltd.**
(Listing Department)
Exchange Plaza, Plot No. C/1, 'G' Block,
Bandra-Kurla Complex,
Bandra (East), Mumbai – 400 051.

**NSE Symbol: VINATIORGA / Series: EQ**

Dear Sir/Madam,

**Sub: Newspaper advertisement in respect to a Special Window for lodgement of transfer and dematerialisation of physical securities**

In furtherance of our public notice dated February 13, 2026 and Pursuant to SEBI Circular No. HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/I/3750/2026 dated January 30, 2026, please find enclosed herewith newspaper advertisements published in Financial Express (English) and Sakal (Marathi) on April 9, 2026, in respect to a special window opened for lodgement of transfer and dematerialisation ("demat") request of physical securities which were sold/purchased prior to April 01, 2019.

This information will also be hosted on the website of the Company at www.vinatiorganics.com.

This is for your information and records.

Thanking you,

Yours faithfully,
For **Vinati Organics Limited**

MILIND ARVIND WAGH
Digitally signed by MILIND ARVIND WAGH
Date: 2026.04.09 10:02:41 +05'30'

**Milind Wagh**
**Sr. Vice President – Company Secretary**
**(ICSI Membership no. FCS- 7125)**

Encl: As above

## फास्ट न्यूज

### अदाणींची खटला रद्द करण्याची मागणी

मुंबई : गौतम अदाणी आणि त्यांचे पुतणे सागर अदाणी यांनी अमेरिकन नियामक सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज कमिशनने दाखल केलेला दिवाणी फसवणुकीचा खटला रद्द करण्याची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार अदाणी यांनी म्हटले आहे की, 'हे प्रकरण अमेरिकेच्या अधिकार क्षेत्राबाहेर आहे आणि यात कोणतेही ठोस आरोप नाहीत.' अदाणी समूहाने न्यूयॉर्कच्या न्यायालयात प्री-मोशन लेटर दाखल करून म्हटले आहे की, ज्या व्यवहाराबाबत आरोप केले आहेत, तो अमेरिकेबाहेर झाला होता. त्यामुळे सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज कमिशनचा खटला कायदेशीरदृष्ट्या कमकुवत आहे आणि तो पूर्णपणे रद्द करावा.

### 'निसान'कडून नेटवर्कचा विस्तार

मुंबई : निसान मोटर इंडिया प्रा. लिमिटेडकडून (एनएमआयपीएल) मुंबईत अत्याधुनिक लक्ष्मी निसान शोरूम आणि कार्यशाळा सुविधांचे उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्रात निसानकडून नेटवर्कचा विस्तार करण्यात येत आहे. निसानच्या नव्या सुविधांमध्ये प्रत्येकी चार गाड्यांची प्रदर्शन क्षमता असलेली घाटकोपरमध्ये २,००० चौरस फूट क्षेत्रात तसेच मालाडमध्ये २,१०० चौरस फुटांची शोरूम आणि कांदिवलीत मासिक ३०० गाड्यांना सर्व्हिसिंग व सुट्या भागांचे पाठबळ देऊ शकणाऱ्या ७,००० चौरस फूट क्षेत्रातील पूर्णपणे सुसज्ज सेवा कार्यशाळेचा समावेश आहे. निसानच्या जागतिक रिटेल मानकांच्या अनुषंगाने तयार केलेली अत्याधुनिक शोरूम्स उच्च दर्जाच्या सुविधांयुक्त असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले.

# डेटा सेंटरमुळे मुंबई डिजिटल हब

## 'इक्विनिक्स'च्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांचा विश्वास

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ८ : भारताच्या डेटा सेंटर क्षमतेपैकी ६० टक्के क्षमता महाराष्ट्रात असताना इक्विनिक्सच्या एमबी ३ डेटा सेंटरमुळे मुंबई हे देशातील प्रमुख डिजिटल हब म्हणून स्थान मजबूत करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

इक्विनिक्सच्या चौथ्या इंटरनॅशनल बिझनेस एक्सचेंज डेटा सेंटरचे उद्घाटन आज येथे फडणवीस यांच्या हस्ते झाले. हे मुंबईतील सर्वांत मोठ्या रिटेल डेटा सेंटरपैकी एक आहे. उच्च कार्यक्षमतेचे वर्कलोड आणि हायब्रीड मल्टी क्लाऊड व्यवहारांसाठी लिक्विड कुलिंग क्षमतेसह हे डेटा सेंटर काम करेल. कंपनीने यवतमाळच्या सौर प्रकल्पानंतर मुंबईत ही गुंतवणूक केल्यामुळे कंपन्यांचा महाराष्ट्राच्या



मुंबई : इक्विनिक्सच्या चौथ्या इंटरनॅशनल बिझनेस एक्सचेंज डेटा सेंटरचे उद्घाटन बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

गुंतवणूक अनुकूल धोरणांवरील विश्वास आणि शाश्वत पायाभूत सुविधांवरील भर दिसून येतो, असेही मुख्यमंत्री या वेळी म्हणाले. कंपनीने ३६ कोटी अमेरिकी डॉलरपेक्षा जास्त गुंतवणूक देशातील डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये केली आहे. त्यांचे मुंबई आणि चेन्नई संकुल डार्क फायबरद्वारे जोडलेले असून त्याद्वारे ४,७२५ कॅबिनेटची क्षमता पुरवली जाते. इक्विनिक्स भारतातील ३००पेक्षा अधिक कंपन्यांना सेवा देते. त्यात नेटवर्क सेवा पुरवठादार, पाच इंटरनेट एक्सचेंज तसेच विविध उद्योग आणि व्यवसाय यांचा समावेश आहे. मुंबईतील तीन संकुलांत भारतीय ग्राहकांसाठी मोठी क्लाऊड परियंत्रणा असून यात अलीबाबा क्लाऊड, गुगल क्लाऊड, आयबीएम क्लाऊड, ओरॅकल क्लाऊड आदी अग्रगण्य क्लाऊड सेवा पुरवठा पुरवठादारांसाठी नेटवर्क आहे. यामुळे ग्राहकांना भारतभर डिजिटल परियंत्रणेत सहज विनाअडथळा प्रवेश मिळतो.

### भारत महत्त्वपूर्ण टप्प्यावर

1. भारताच्या आर्थिक बाजारपेठा वेगाने पुढे जात असताना आपल्या पायाभूत सुविधांनाही त्या वेगाशी जुळवून घ्यावे लागेल, असे कोटक सिक्युरिटीचे अनिल कुमार नायर म्हणाले.
2. डिजिटल भविष्याला आकार देण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असे इक्विनिक्सच्या आशिया प्रशांत विभागाचे अध्यक्ष सायरस अडगरा म्हणाले.
3. भारत डिजिटल परिवर्तनाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर असून एआय आणि क्लाऊडच्या वाढत्या स्वीकारामुळे आर्थिक वाढीच्या पुढील टप्प्याला आकार मिळेल, असे इक्विनिक्सचे व्यवस्थापकीय संचालक मनोज पॉल म्हणाले.

# ई-कॉमर्समधील नोकर भरतीत वाढ

## तंत्रज्ञान क्षेत्रात सर्वात मोठा बदल

मुंबई, ता. ८ : भारताच्या ई-कॉमर्स आणि क्विक कॉमर्स क्षेत्रात पुन्हा भरती सुरू झाली आहे, परंतु त्याची कार्यपद्धती बदलल्याचा अहवाल 'सीआएईएल एचआर'ने दिला आहे.

'सीआएईएल एचआर'च्या अहवालानुसार, कंपन्यांनी विस्तारआधारित भरतीऐवजी तांत्रिक क्षमता आणि अंमलबजावणीची ताकद वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. २०२३ ते २०२५ दरम्यान कुशल मनुष्यबळाची मागणी ३५ टक्क्यांनी वाढून जवळपास ९८,७५० पदांपर्यंत पोहोचली आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील नोकर भरतीमध्ये सर्वात मोठा बदल दिसून येत आहे. गेल्या दोन वर्षांत अभियंता (इंजिनिअरिंग) पदांची मागणी तिपटीहून अधिक वाढली आहे. कंपन्या ऑटोमेशन आणि प्लॅटफॉर्म स्थिरतेमध्ये अधिक गुंतवणूक करीत असल्याने अभियंता या पदांमध्ये तीन पट वाढ झाली आहे.

### ३० ते ४० टक्के अधिक पगार!

एआय तज्ज्ञांना पारंपरिक टेक नोकऱ्यांच्या तुलनेत ३० ते ४० टक्के अधिक पगार मिळतो, तर वरिष्ठ प्रतिभावंतांना वार्षिक ५० लाखांपर्यंत पगार मिळत आहे, असे सीआएईएल एचआरचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ आदित्य नारायण मिश्रा यांनी नमुद केले.

प्लॅटफॉर्म क्षमतेला प्राधान्य दिले जात असल्याने आता जवळपास ५० टक्के नवीन भरती तंत्रज्ञान, उत्पादन आणि ऑपरेशन्स विभागात होत आहे. कंपन्या सोल्युशन आर्किटेक्ट्स आणि एआय व मशीन लर्निंग तज्ज्ञांना प्राधान्य देत आहेत. क्यू-कॉम लहान शहरांमध्ये अधिक खोलवर शिरत असल्याने ऑपरेशन्स आणि गिग वर्कर्स महत्त्वपूर्ण ठरतात.

# खतांसाठी ४१ हजार कोटींचे अनुदान

## यंदाच्या खरीप हंगामासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय

नवी दिल्ली, ता. ८ : आगामी खरीप हंगामासाठी केंद्र सरकारने पोषक घटक आधारित खतांवरील ४१ हजार कोटी रुपयांच्या अनुदानाला मंजुरी दिली आहे. यासोबतच अरुणाचल प्रदेशातील महत्त्वाकांक्षी जलविद्युत प्रकल्पांना आणि एचपीसीएल राजस्थान रिफायनरीच्या विस्ताराला आणि जयपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाला देखील केंद्र सरकारने हिरवा कंदील दाखवला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत खत अनुदान, ऊर्जा पायाभूत सुविधा, शहरी परिवहन आणि जलविद्युत प्रकल्प यासारख्या तब्बल १.७४ कोटी रुपये खर्चाच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकारपरिषदेत या निर्णयांची माहिती दिली.



मंत्रिमंडळाने खरीप हंगाम २०२६ साठी फॉस्फेटिक आणि पोटॅसिक (पी अँड के) खतांवरील पोषक तत्त्व आधारित अनुदान दरांना आज मंजुरी दिली. एक एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीसाठी हे दर लागू राहतील.

### रिफायनरीचा विस्तार

राजस्थानमधील एचपीसीएल रिफायनरीच्या विस्ताराचाही निर्णय आज घेण्यात आला. यासाठी ७९ हजार ४५९ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चाला मंजुरी देण्यात आली. तसेच एचपीसीएलकडून कडून १९ हजार ६०० कोटी रुपयांच्या इक्विटी योगदानालाही मान्यता देण्यात आली. या रिफायनरीच्या बांधकामाच्या काळात सुमारे एक लाख लोकांना रोजगार मिळणार असून, संचालन सुरू झाल्यानंतर सुमारे दहा हजार लोकांना थेट रोजगार उपलब्ध होईल, असे सरकारतर्फे सांगण्यात आले.

# मुद्रा योजनेतून ११ वर्षांत ४० लाख कोटींचे कर्जवाटप


सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. ८ : ग्रामीण आणि शहरी भागातील सूक्ष्म उद्योगांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी वाढवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेला आज अकरा वर्षे पूर्ण झाली.

या योजनेअंतर्गत आतापर्यंत ५७ कोटींहून अधिक लाभार्थींना कर्ज मंजूर करण्यात आले असून एकूण ४०.०७ लाख कोटी रुपयांचे वाटप केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आठ एप्रिल २०१५ रोजी मुद्रा योजनेची सुरुवात केली होती.

**२०२४-२५ या आर्थिक वर्षात कर्ज वाटप**




### योजनेचे स्वरूप

- बिगर औद्योगिक आणि शेतीव्यतिरिक्त इतर उत्पन्न मिळणाऱ्या कामासाठी कर्ज
- शिशु, किशोर, तरुण व तरुण प्लस असे चार गटांसाठी कर्ज

# सोने, चांदीच्या दरात वाढ

मुंबई, ता. ८ : अमेरिका आणि इराण यांच्यातील दोन आठवड्यांच्या युद्धविरामानंतर बुधवारी (ता. ८) सोने आणि चांदीच्या दरात वाढ झाली आहे.

इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशननुसार, १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा दर चार हजार रुपयांनी वाढून १.५२ लाख रुपयांवर पोहोचला आहे. यापूर्वी ७ एप्रिलला त्याची किंमत १.४८ लाख रुपये प्रति १० ग्रॅम होती. तर, एक किलो चांदीचा दर १३ हजार रुपयांनी वाढून २.४४ लाख रुपयांवर पोहोचला आहे. यापूर्वी तो २.३१ लाख रुपये प्रति किलो होता.

ताज्या बातम्यांसाठी पाहा... eSakal.com || मराठी मन, जागतिक स्पंदन ||

## नगर पंचायत कार्यालय, मंठा

ता.मंठा, जि. जालना.४३१५०४

Email id :npmantha@gmail.com — दुरध्वनी क्रं. :(02484)271122

जा.क्रं.नपमं/वि.यो./337 — दिनांक :- 08/04/2026

**ई - निविदा सुचना क्रमांक - 01 सन 2026-27 (पहिली वेळ)**

मंठा नगर पंचायत यास वैशिष्ट्यपूर्ण योजना अंतर्गत सन 2025-26 निधी अंतर्गत मंठा शहराच्या हद्दीमध्ये विविध विकास कामे करण्यासाठी, सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांच्याकडुन मुख्याधिकारी नगर पंचायत मंठा ता. मंठा जि. जालना शतमान पध्दतीने ई- निविदा मागवित आहे.

सदर ई-निविदा शासनाच्या https://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर दि. 09.04.2026 रोजी पासुन पाहता व दाखल करता येईल. तसेच शक्य झाल्यास प्राप्त निविदा ऑनलाईन पध्दतीने (ई-निविदेत दिल्याप्रमाणे ज्या-त्या तारखेस) उघडण्यांत येईल. निविदा संबंधीची सविस्तर माहिती/ अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहाण्यासाठी उपलब्ध आहे.

- सदर कामाच्या तांत्रिक मान्यतेनुसार काम करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
- सदर कामाचा तांत्रिक मान्यतेस आधीन राहून निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्यानुसार कार्यादेश वितरीत करण्यात येइल.
- कोणतीही निविदा दर मंजुर अगर नामंजुर करणेचा अधिकार नगर पंचायतने राखुन ठेवलेला आहे.
- निविदे सोबत कोणतीही मार्गदर्शक सुचना, शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहावयास मिळेल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत मंठा

## बृहन्मुंबई महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन – वाहतूक
पूर्व उपनगरे
क्र. EE/Tr./ES/182/SWM, dtd. 08.04.2026

**ई–निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे (मनपा) आयुक्त हे खालील ऑनलाइन निविदा मागवीत आहेत:

| अ. क्र. | कामाचे वर्णन व ई–बोली क्र. | इसारा रक्कम ठेव (रु.) | निविदा शुल्क (रु.) | बोली प्रारंभ दिनांक व वेळ | बोली समाप्ती दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | कार्य. अभि. (वाह.) पूर्व उपनगरे अंतर्गत पूर्व उपनगर विभागात एम पूर्व विभागाच्या आवश्यकतांच्या पूर्ततेकरिता मजुरांसहित टेम्पो वाहन भाड्याने घेण्याचे काम. टेंडर आयडी : 2026_MCGM_1293410_1 | २४,०००/– | ३९९३/– + @१८% जीएसटी | दि. ०९.०४.२०२६ रोजी दु. ४.०० वा. | दि. १६.०४.२०२६ रोजी दु. ४.०० वा. |
| २. | कार्य. अभि. (वाह.) पूर्व उपनगरे अंतर्गत पूर्व उपनगर विभागात एम पश्चिम विभागाच्या आवश्यकतांच्या पूर्ततेकरिता मजुरांसहित टेम्पो वाहन भाड्याने घेण्याचे काम. टेंडर आयडी : 2026_MCGM_1293412_1 | २४,०००/– | ३९९३/– + @१८% जीएसटी | दि. ०९.०४.२०२६ रोजी दु. ४.०० वा. | दि. १६.०४.२०२६ रोजी दु. ४.०० वा. |
| ३. | पूर्व उपनगरे विभागातील विविध वॉर्ड्समध्ये अतिक्रमण हटाव कृतीकरिता परवाना विभागाच्या वापराकरिता भाडेतत्त्वावर मजुरांशिवाय अतिक्रमण हटाव वाहनाचा पुरवठा करण्याचे काम. ग्रूप ए (झेड –५, एल, एम/पूर्व व एम/पश्चिम विभाग) टेंडर आयडी : 2026_MCGM_1293413_1 | २४,०००/– | ३९९३/– + @१८% जीएसटी | दि. ०९.०४.२०२६ रोजी दु. ४.०० वा. | दि. १६.०४.२०२६ रोजी दु. ४.०० वा. |
| ४. | पूर्व उपनगरे विभागातील विविध वॉर्ड्समध्ये अतिक्रमण हटाव कृतीकरिता परवाना विभागाच्या वापराकरिता भाडेतत्त्वावर मजुरांशिवाय अतिक्रमण हटाव वाहनाचा पुरवठा करण्याचे काम. ग्रूप बी (झेड –६, एन, एस व टी विभाग) टेंडर आयडी : 2026_MCGM_1293414_1 | २४,०००/– | ३९९३/– + @१८% जीएसटी | दि. ०९.०४.२०२६ रोजी दु. ४.०० वा. | दि. १६.०४.२०२६ रोजी दु. ४.०० वा. |
| ५. | कार्य अभि. (वाह.) पूर्व उपनगरे विभागांतर्गत विविध गॅरेजेसकरिता बहुउपयोगी मजूर (एम पीडब्ल्यू) नेमण्याचे काम. टेंडर आयडी : 2026_MCGM_1293415_1 | २४,०००/– | ३९९३/– + @१८% जीएसटी | दि. ०९.०४.२०२६ रोजी दु. ४.०० वा. | दि. १६.०४.२०२६ रोजी दु. ४.०० वा. |

निविदा प्रत महाराष्ट्र शासनाची ई–प्रापण प्रणाली (महाटेंडर्स) (https://mahatenders.gov.in) वरून डाऊनलोड करता येऊ शकेल तसेच निविदा प्रत मनपाचे पोर्टल वेबसाइट (http://portal.mcgm.gov.in) वरूनही डाऊनलोड करता येऊ शकेल.

पीआरओ/४४/जाहि./२०२६–२७ — सही/– कार्यकारी अभियंता (वाहतूक) पूर्व उपनगरे

**जलजन्य आजार टाळण्यासाठी पाणी गाळून व उकळून प्यावे.**

## भा.कृ.अनु.प. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था
(भारतीय कृषि अनुसंधान परिषद)
एडनवाला मार्ग, माटुंगा, मुंबई-400019.
Telephone (022)-24127273
Web Site: https://circot.icar.gov.in Mail: director-circoticar.org.in

**प्रत्यक्ष मुलाखत (हाइब्रिड मोड)**

भा.कृ.अनु.प. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेमध्ये फार्मास्युटिकल डेवलपमेंट ऑफ टेक्सटाइल-बेस्ड नॉवेल मेडिकेटिड ड्रेसिंग्ज् (आयुष जे, आयुष जेएम, आयुष जेटीएम) फॉर वाँड हीलिंग फ्रॉम क्लासिकल आयुर्वेदिक फॉर्म्युलेशन्स प्रकल्पा अंतर्गत प्रकल्प संशोधन शास्त्रज्ञ-I (नॉन-मेडिकल), एका (01) कंत्राटी पदासाठी दिनांक 24.04.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता संस्थेच्या माटुंगा स्थित मुख्यालयात प्रत्यक्ष मुलाखत (हाइब्रिड मोड) घेण्यात येणार आहे. वरील पदासाठी आवश्यक अर्हता, मानधन, वयोमर्यादा इत्यादी तपशीलवार माहितीसाठी इच्छुक उमेदवारांनी भा.कृ.अनु.प. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संस्थेच्या संकेतस्थळावर लॉग इन करावे. संकेतस्थळः https://circot.icar.gov.in

हस्ता/-
वरिष्ठ प्रशासनिक अधिकारी

## भा.कृ.अनु.प. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था
(भारतीय कृषि अनुसंधान परिषद)
एडनवाला मार्ग, माटुंगा, मुंबई-400019.
Telephone (022)-24127273
Web Site: https://circot.icar.gov.in Mail: director-circoticar.org.in

**प्रत्यक्ष मुलाखत (हाइब्रिड मोड)**

भा.कृ.अनु.प. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेमध्ये ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या योजनेअंतर्गत वित्तपोषित डेवलपमेंट एंड टेक्नो-कमर्शियल एनालिसिस ऑफ एग्रो-बायोमास बेस्ड टॉरेफाइड पेलेट्स विथ डिजायरेबल वोलेटाइल मॅटर फॉर पावर प्लांट ऍप्लिकेशन्स प्रकल्पाअंतर्गत सिनिअर रिसर्च फेलो (एस.आर.एफ.) एका (01) कंत्राटी पदासाठी दिनांक 24.04.2026 रोजी दुपारी 2.30 वाजता संस्थेच्या माटुंगा स्थित मुख्यालयात प्रत्यक्ष मुलाखत (हाइब्रिड मोड) घेण्यात येणार आहे. वरील पदासाठी आवश्यक अर्हता, मानधन, वयोमर्यादा इत्यादी तपशीलवार माहितीसाठी इच्छुक उमेदवारांनी भा.कृ.अनु.प. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संस्थेच्या संकेतस्थळावर लॉग इन करावे. संकेतस्थळ: https://circot.icar.gov.in

हस्ता/-
वरिष्ठ प्रशासनिक अधिकारी

## विनाती ऑर्गेनिक्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** बी-१२ आणि बी-१३/१, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, महाड- ४०२३०९, जि. रायगड, महाराष्ट्र, भारत.
**कॉर्पोरेट कार्यालय :** परिनी क्रेसेन्झो, ११०२, ११ वा मजला, 'जी' ब्लॉक, प्लॉट क्रमांक सी ३८ आणि सी ३९, एमसीएच्या मागे, बीकेसी, वांद्रे (पूर्व), मुंबई -५१.
**दूरध्वनी-** +९१-२२-६१२४०४४४/२८, **फॅक्स-** +९१-२२-६१२४०४३८, **CIN:** L24116MH1989PLC052224
ईमेल: shares@vinatiorganics.com संकेतस्थळ : www.vinatiorganics.com

**सूचना**
**प्रत्यक्ष सिक्युरिटिजचे हस्तांतरण आणि डिमटेरिअलायजेशनसाठी विशेष खिडकी**

**सेबी परिपत्रक क्र. HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD-POD/1/3750/2026 दिनांक ३० जानेवारी २०२६** नुसार, **०१ एप्रिल २०१९ च्या पूर्वी विक्री/खरेदी** केलेल्या प्रत्यक्ष सिक्युरिटिजच्या हस्तांतरण आणि डिमटेरिअलायजेशन ('डिमॅट') विनंती दाखल करून घेण्यासाठी एक विशेष खिडकी उघडण्यात येणार आहे. **०५ फेब्रुवारी २०२६ पासून ते ०४ फेब्रुवारी २०२७ पर्यंत** १ (एक) वर्षाच्या कालावधीसाठी विशेष खिडकी उघडण्यात येणार आहे आणि खालील प्रकरणांमध्ये लागू होणार आहे.

१. जेथे मूळ भाग हस्तांतरणाची विनंती १ एप्रिल २०१९ पूर्वी दाखल केलेली नाही, आणि भागधारकाकडे मूळ भाग प्रमाणपत्र आहे;
२. जेथे मूळ भाग हस्तांतरण विनंत्या ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी दाखल केल्या होत्या आणि त्या कागदपत्रांमधील, प्रक्रियेतील किंवा इतर त्रुटींमुळे नाकारण्यात आल्या, परत करण्यात आल्या किंवा त्यावर कार्यवाही झाली नाही.

विनंत्या कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी म्हणजेच MUFG इनटाईम इंडिया प्रा. लि. (पूर्वीचे नाव लिंक इनटाइम इंडिया प्रा. लि.), युनिट: विनाती ऑर्गेनिक्स लिमिटेड, सी-१०१, एम्बॅसी २४७, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०००८३, ईमेल आयडी: investor.helpdesk@in.mpms.mufg.coma आणि संपर्क: +९१ ८१०८११६७६७ येथे दाखल केल्या जाऊ शकतात.

कृपया नोंद घ्यावी की, हे भाग हस्तांतरित करणाऱ्याच्या नावे अनिवार्यपणे **फक्त डिमॅट स्वरूपातच** जमा केले जातील आणि हस्तांतरणाच्या नोंदणीच्या दिनांकापासून **एक वर्षाच्या कालावधीसाठी लॉक-इन अंतर्गत** राहतील. या लॉक-इन कालावधीत या सिक्युरिटीजचे हस्तांतरण/गहाण ठेवणे/तारण ठेवणे केले जाणार नाही.

**विनाती ऑर्गेनिक्स लिमिटेडकरिता**
**सही/-**
**मिलिंद वाघ**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
**(ICSI Membership No. FCS : 7125)**

**दिनांक: ०८ एप्रिल, २०२६**
**ठिकाण: मुंबई**

## हुहत्माकी इंडिया लिमिटेड

**(CIN No.** L21011MH1950FLC145537)
**नोंदणीकृत कार्यालय :** ७ वा मजला, बेलोना, दि वॉक, हिरानंदानी इस्टेट, घोडबंदर रोड, ठाणे, महाराष्ट्र -४०० ६०७ **दूरध्वनी क्र. :** +९१ (२२) ६१७४ ०१००
**संकेतस्थळ :** www.flexibles.huhtamaki.in
**ई-मेल पत्ता :** investor.communication@huhtamaki.com

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC)/इतर दृकश्राव्य माध्यम (OAVM) आणि रेकॉर्ड डेटद्वारे होणारी वार्षिक सर्वसाधारण सभा**

कंपनीच्या सभासदांनी याद्वारे नोंद घ्यावी की, सेबी LODR नियमन आणि मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सद्वारे (MCA) जारी सर्व लागू परिपत्रकांसह वाचावा आणि याबाबतीत जारी (एमसीए परिपत्रक) इतर परिपत्रके आणि सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ सह वाचावा, सर्वसाधारण परिपत्रक क्र. २०/२०२०, दिनांक ०५ मे २०२० सह अनुपालनामध्ये सभेच्या सूचनेमध्ये स्थापित व्यवसायांचे व्यवहार करण्यासाठी कंपनीची ७६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM) **शुक्रवार, ०८ मे २०२६ रोजी दुपारी २.३० वा. (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC)/इतर दृकश्राव्य माध्यमाद्वारे (OAVM) होणार आहे.**

सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की :

- एजीएम सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक्स प्रती आणि वार्षिक अहवाल २०२५ सर्व भागधारकांना पाठविण्यात येईल ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/ डिपॉजिटरी पार्टिसिपंटकडे नोंदणीकृत आहेत आणि **कंपनी भागधारकांना एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवालाच्या प्रत्यक्ष प्रती पाठविणार नाही.**
- भागधारकांकडे डिमटेरिअलाईज्ड स्वरुपात भाग आहेत आणि ज्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत नाहीत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या डिपॉजिटरी पार्टिसिपंटद्वारे त्यांच्या संबंधित डिपॉजिटर्ससह त्यांचे ई-मेल पत्ते आणि मोबाईल क्रमांक नोंदणीकृत करावेत.
- सेबी परिपत्रक दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ नुसार जर संपूर्ण बँक तपशील फोलिओ/ डिमॅट खात्यासाठी नोंदणीकृत केले नसल्यास, कंपनीद्वारे जाहीर भविष्यातील सर्व लाभांशाला तात्पुरती स्थगिती देण्यात येईल.
- ज्या भागधारकांकडे समक्ष स्वरूपात भाग आहेत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांचे होल्डींग्ज डिमटेरिअलाईज्ड करावेत किंवा विनंती करण्यात येते की, त्यांच्या खात्याची केवायसी पूर्तता करावी. लाभांश फक्त अशा सभासदांना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देण्यात येईल जे केवायसी पूर्तता करतील.
- भागधारकांना विनंती करण्यात येते की, कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी **MUFG इन टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडसह** (पूर्वीचे नाव लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) लाभांश प्राप्तीसाठी त्यांचे बँक खाते तपशील अद्ययावत करावेत आणि मोबाईल क्रमांक आणि त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकरणासाठी संबंधित आयडी आणि पत्त्याच्या कागदपत्रांसह संबंधित इन्व्हेस्टर सर्व्हिस रिक्वेस्ट फॉर्म (ISR-1 and ISR-2) सादर करण्याद्वारे त्यांच्या फोलिओ केवायसीची पूर्तता करावी. वरील फॉर्म कंपनीचे आरटीए संकेतस्थळ https://in.mpms.mufg.com/ वर उपलब्ध आहेत.
- भागधारकांकडे डिमटेरिअलाईज्ड स्वरुपात भाग असल्यास, त्यांना त्यांचे बँक/ ECS तपशील जेथे लागू असेल तेथे, त्यांच्या डिपॉजिटरी पार्टिसिपंटद्वारे लाभांशाच्या प्राप्तीसाठी अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येत आहे.
- जर अगोदर केले नसल्यास, सर्व भागधारकांना त्यांचे KYC तपशील अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येत आहे.

इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे एजीएमच्या सूचनेमध्ये स्थापित व्यवसायांच्या व्यवहारांवर एजीएमदरम्यान किंवा एजीएमपूर्वी त्यांचे मतदान रिमोटली करण्याची संधी भागधारकांना मिळाली आहे. डिमटेरिअलाईज्ड स्वरुपात, प्रत्यक्ष स्वरुपात भागधारक धारण करीत असलेल्या भागांसाठी एजीएम दरम्यान किंवा एजीएमपूर्वी रिमोटली मतदानाची पद्धती आणि भागधारक ज्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांना भागधारकांच्या सूचनेमध्ये पुरविण्यात येतील.

७६ व्या एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल २०२५ कंपनीचे संकेतस्थळ www.flexibles.huhtamaki.in, स्टॉक एक्स्चेंजचे संकेतस्थळ www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि NSDL चे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com वर सुद्धा उपलब्ध आहे.

कंपनी कायदा २०१३ चे कलम ९१ च्या तरतुदींच्या अटीमध्ये आणि त्याअंतर्गत लागू नियमांनुसार, मंडळाद्वारे सुचविण्यात आलेल्यानुसार, आर्थिक वर्ष ३१ डिसेंबर २०२५ साठी लाभांश देयकाच्या हेतूसाठी **रेकॉर्ड दिनांक** म्हणून **गुरूवार २३ एप्रिल २०२६** कंपनीने निश्चित केली आहे. एजीएममध्ये लाभांश मंजूर झाल्यानंतर एजीएमच्या ३० दिवसांमध्ये अशा सभासदांना देण्यात येईल ज्यांनी KYC पूर्ण केले आहे आणि ज्यांची नावे **गुरूवार, २३ एप्रिल २०२६** रोजी कंपनी सभासदांच्या रजिस्टरमध्ये दिसत आहेत.

नवीन आयकर कायदा २०२५ च्या तरतुदीनुसार (दि आयटी ॲक्ट), सभासदांच्या हातामध्ये येणारी लाभांश रक्कम करपात्र असते आणि लागू दरांनुसार, कंपनीला सभासदांना लाभांशाची रक्कम करवजावटीच्या स्रोतावर (TDS) देणे आवश्यक आहे. आर अँड टी प्रतिनिधी /डिपॉजिटरी पार्टिसिपंटसोबत आधारसह त्यांचे वैध लिंक्ड् पॅनकार्ड अद्ययावत करण्याची विनंती भागधारकांना करण्यात येत आहे. जर आर्थिक वर्ष २०२६-२७ दरम्यान निवासी वैयक्तिक भागधारकाचे लाभांश उत्पन्न ₹ १०,००० पेक्षा जास्त नसल्यास टीडीएसची वजावट होणार नाही. याबाबतचा ई-मेल संबंधित भागधारकांना अगोदरच पाठविण्यात आलेला आहे.

सेबी त्यांचे परिपत्रके दिनांक ३ नोव्हेंबर २०२१ नुसार (पाठोपाठची सुधारीत परिपत्रके दिनांक १४ डिसेंबर २०२१, १६ मार्च २०२३ आणि १७ नोव्हेंबर २०२३) सिक्युरिटी होल्डर्स आवश्यक केली आहेत (समक्ष स्वरुपामध्ये सिक्युरिटीज धारण करणारांसाठी) ज्यांच्या फोलिओमध्ये पॅन किंवा नामांकनाची निवड किंवा संपर्क तपशील किंवा मोबाईल क्रमांक किंवा बँक खात्याचे तपशील किंवा नमुना स्वाक्षरी अद्ययावत केलेली नाही अशा फोलिओच्या संबंधात लाभांश, व्याज किंवा पूर्तता यासह कोणत्याही पेमेंटसाठी केवळ १ एप्रिल २०२४ पासून इलेक्ट्रॉनिक पर्यायाद्वारे संपूर्णमध्ये त्यांचे वर नमूद तपशील सादर केल्यानंतर पात्र असेल.

वरील सर्व तपशील संपूर्णपणे सादर केल्यावर वरील माहिती एमसीए परिपत्रकांसह अनुपालनामध्ये आणि कंपनीच्या सभासदांच्या लाभासाठी आणि माहितीसाठी जारी करण्यात आलेली आहे.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे
हुहत्माकी इंडिया लिमिटेडकरिता

एप्रिल २०२६ — अभिजात सिन्हा
ठाणे — कंपनी सचिव आणि लीगल कौन्सिल